ePaper
अमेरिका संकटात, भारताकडे मागितली मोठी मदत, डोनाल्ड ट्रम्प तोंडावर
वर्ष - 9 । अंक -54 UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- पाकिस्तानबरोबर नो हँडशेकला पूर्णविराम?
- रणजीमध्ये महाराष्ट्राची उडाली भंबेरी!
- सकारात्मक तोडगा निघणार?
- अमेरिकन पासपोर्ट टॉप १० मधून बाहेर!


www.mahaenews.com । गुरुवार दि. 16 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### ठाकरे बंधू संतापले
### विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाला घेरले

# विरोधकांनी आयोगाला फोडला घाम!

## राज ठाकरेंसह मविआच्या शिष्टमंडळाची शिवालयमध्ये बैठक



। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**यादयांतील प्रचंड गोंधळ, दुबार नावे, अस्तित्वात नसलेले पत्ते, चुकीचे वय, एकाच पत्त्यावर शेकडो मतदार यांसारख्या मुद्द्यांवरून विरोधकांनी निवडणूक आयोगाला धारेवर धरले. राज ठाकरे यांनी संतप्त स्वरात विचारले, "मतदार नोंदणी बंद करून लपवाछपवी कशासाठी करता? सर्व पक्षांचं एकमत होत नाही तोपर्यंत निवडणुका घेऊ नका."**

त्यांनी पुढे सांगितले, "आमचं तुमचं करू नका, निवडणूक आयोग एकच आहे. आठ दिवसांची मुदत द्या, सगळं स्पष्ट करा. मतदार यादीत घोळ असेल तर आम्ही तयार नाही. सगळं व्यवस्थित केल्याशिवाय निवडणुका घेऊ नका. इतकी वर्षे झाली, आता आम्ही थांबणार नाही."

राज ठाकरे यांनी त्रुटींची उदाहरणे देत सांगितले की, "एका घरात १३४ वर्षांची मुलगी आणि ४० वर्षांचा वडील दाखवला आहे! हे नेमकं कोण करतंय? निवडणूक लढवतो आम्ही आणि नियंत्रण तुम्ही ठेवता — ही पारदर्शकता कुठे आहे?"

### उद्धव ठाकरेंचा थेट सवाल

शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही आयोगावर थेट निशाणा साधला. ते म्हणाले, "मतदार याद्याबाबत आम्ही कुणाला विचारायचं? त्रुटींनी भरलेल्या याद्यांवर निवडणुका घेण्याचा काय अर्थ? मग थेट सिलेक्शन करा, इलेक्शन नको!" "VVPAT तुम्ही वापरत नाही, म्हणजे सर्व पुरावे नष्ट करणार. निवडणूक आयोग हा काही हरिश्चंद्र नाही," असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

त्यांनी पुढे म्हटलं, "भाजपचे काही कार्यकर्ते मतदार याद्यांमध्ये मनमानी करत आहेत. ज्यांना पाहिजे त्यांची नावे घालतात, नको असलेल्यांची वगळतात. हा लोकशाहीचा खेळखंडोबा आहे."

### मविआच्या नेत्यांची तीव्र टीका

या बैठकीत काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे जयंत पाटील, आणि विजय वडेट्टीवार यांनीही आयोगाकडे तीव्र आक्षेप नोंदवले.

**थोरात म्हणाले,** "विधानसभा निवडणुकीत आम्ही दाखवलेल्या त्रुटीवर काम झाले नाही. आता स्थानिक स्वराज्य निवडणुकांपूर्वी पुन्हा त्याच चुका सुरू आहेत."

**जयंत पाटील म्हणाले,** "आमचा आरोप आहे की आयोगाची वेबसाईट काही बाहेरचं माणूस हँडल करतं. अनेक ठिकाणी एकाच EPIC क्रमांकाचे मतदार, अस्तित्वात नसलेली घरे आणि खोटी नावे आढळली आहेत. ही थट्टा खपवून घेतली जाणार नाही." **विजय वडेट्टीवार** यांनी गंभीर आरोप करत सांगितले, "देवांग दवे नावाचा भाजप कार्यकर्ता निवडणूक आयोगाच्या मीडियाशी संबंधित कामकाज पाहतो. हा निवडणूक प्रक्रियेत थेट हस्तक्षेप आहे."

### राज ठाकरे – "आम्ही शांत बसणार नाही"

राज ठाकरे म्हणाले, "२०२२ मध्ये बेसावध राहिलो, पण आता होणार नाही. सगळं स्पष्ट होईपर्यंत निवडणुका घेऊ नका. मतदार याद्या आम्ही तपासतो, मतदार आमच्याशी संपर्कात असतात, पण तुम्ही त्यांना डिलीट करता." त्यांनी आणखी पुढे प्रश्न उपस्थित केला, "बाळासाहेब थोरात आठ टर्ममध्ये ८०-९० हजार मतांनी जिंकतात, पण यंदा लाखाने पडले, हे कसं शक्य? यावर आयोगाने उत्तर द्यावं."

### आयोगाचे स्पष्टीकरण

या सर्व आरोपांवर निवडणूक आयोगाने उत्तर दिलं की, "आम्ही मागचीच मतदार यादी वापरत आहोत. १ जुलै ही तारीख निश्चित केली होती. नावं डिलीट करणं किंवा बदलणं ही आमच्या अधिकारात नाही." तसेच आयोगाने विरोधकांना सांगितले, "तुम्ही पुरावे सादर करा, आम्ही तपास करू."

### मुख्यमंत्री फडणवीसांचा पलटवार

विरोधकांच्या या आंदोलनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पलटवार केला. ते म्हणाले, "राजकारणात एवढे गोंधळलेले विरोधक मी पाहिले नाहीत. पहिल्या दिवशी एका अधिकाऱ्याला भेटले, दुसऱ्या दिवशी दुसऱ्याला. निवडणुका जवळ आल्या की वातावरणनिर्मिती सुरू होते."

## पुढील रणनितीची घोषणा लवकरच

विरोधी पक्षांनी स्पष्ट केलं की, निवडणूक आयोगाच्या प्रतिसादानंतर पुढील रणनीती ठरवली जाईल. "सदोष याद्यांवर निवडणुका नकोत, हे आमचं एकमत आहे. आयोगाने दोष दूर केल्याशिवाय निवडणुका घेऊ नयेत," अशी ठाम भूमिका मविआ व मनसेने मांडली. शिवालयमध्ये झालेली ही बैठक विरोधकांसाठी निर्णायक ठरली. ठाकरे बंधूंसह मविआचे नेते एकाच व्यासपीठावर येऊन "निष्पक्ष निवडणुका व्हाव्यात" या मुद्द्यावर एकवटले. आयोगाने मात्र आपल्या मर्यादा दाखवत "पुरावे सादर करा, मग तपास करू" असे उत्तर दिले. राज्याच्या निवडणूक राजकारणात या भेटीने नव्या समीकरणांना तोंड फोडले असून, "तोपर्यंत निवडणुका घेऊच नका" हा विरोधकांचा नारा आता पुढील राजकीय हालचालींचं केंद्र ठरला आहे.

२२ हजार कोटींचं कर्ज

## शहर कधीच कर्जबाजारी नव्हतं : अजित पवार

# 22 हजार कोटींचं कथित कर्ज प्रकरण

## शेखर सिंह यांच्या काळात भ्रष्टाचार

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या कार्यकाळात अनेक भ्रष्टाचार झाल्याचे आरोप झाले. या प्रकरणानंतर आता पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर विकासकामांच्या नावावर २२ हजार कोटींचं कर्ज केल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. त्यावर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाष्य केले आहे. अजित पवार हे पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते..**



पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांची बदली नुकतीच नाशिक येथे झाली. त्यांच्यावर आगामी कुंभमेळ्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. दरम्यान, शेखर सिंह यांची बदली झाल्यानंतर अनेक संस्था, कंत्राटदार, तसेच नेत्यांनी त्यांचा भव्य- दिव्य असा सत्कार करून, त्यांना निरोप दिला.त्यावरून शेखर सिंह यांच्यावर आरोप- प्रत्यारोप होत आहेत. तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या कार्यकाळात अनेक भ्रष्टाचाराची कामे झाल्याच बोललं जात आहे.पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर विकासकामांच्या नावाने तब्बल २२ हजार कोटींचं कर्ज केल्याचं बोललं जातं आहे. अजित पवार म्हणाले, महानगर पालिकेवर २२ हजार कोटींचा कर्जाचा बोजा झाला आहे. याबाबत श्रावण हर्डीकर यांना विचारलं दबक्या आवाजात अशी चर्चा सुरू आहे. याविषयी त्यांना सत्य पडताळायला सांगितलं आहे. पिंपरी- चिंचवड शहराचं २५ वर्षं मी नेतृत्व केलं आहे. मी कधीही एक रुपयाचं शहरावर कर्ज होऊ दिलं नाही. असे अजित पवार यांनी म्हटले आहे.महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या कार्यकाळात अनेक भ्रष्टाचार झाल्याचे आरोप झाले. या प्रकरणानंतर आता पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर विकासकामांच्या नावावर २२ हजार कोटींचं कर्ज केल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. त्यावर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाष्य केले आहे. अजित पवार हे पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते..

पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांची बदली नुकतीच नाशिक येथे झाली. त्यांच्यावर आगामी कुंभमेळ्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. दरम्यान, शेखर सिंह यांची बदली झाल्यानंतर अनेक संस्था, कंत्राटदार, तसेच नेत्यांनी त्यांचा भव्य- दिव्य असा सत्कार करून, त्यांना निरोप दिला.त्यावरून शेखर सिंह यांच्यावर आरोप- प्रत्यारोप होत आहेत. तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या कार्यकाळात अनेक भ्रष्टाचाराची कामे झाल्याच बोललं जात आहे.पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर विकासकामांच्या नावाने तब्बल २२ हजार कोटींचं कर्ज केल्याचं बोललं जातं आहे. अजित पवार म्हणाले, महानगर पालिकेवर २२ हजार कोटींचा कर्जाचा बोजा झाला आहे. याबाबत श्रावण हर्डीकर यांना विचारलं दबक्या आवाजात अशी चर्चा सुरू आहे. याविषयी त्यांना सत्य पडताळायला सांगितलं आहे. पिंपरी- चिंचवड शहराचं २५ वर्षं मी नेतृत्व केलं आहे. मी कधीही एक रुपयाचं शहरावर कर्ज होऊ दिलं नाही. असे अजित पवार यांनी म्हटले आहे.पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांची बदली नुकतीच नाशिक येथे झाली. त्यांच्यावर आगामी कुंभमेळ्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. दरम्यान, शेखर सिंह यांची बदली झाल्यानंतर अनेक संस्था, कंत्राटदार, तसेच नेत्यांनी त्यांचा भव्य- दिव्य असा सत्कार करून, त्यांना निरोप दिला. त्यावरून शेखर सिंह यांच्यावर आरोप- प्रत्यारोप होत आहेत. तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या कार्यकाळात अनेक भ्रष्टाचाराची कामे झाल्याच बोललं जात आहे

### पालिकेवर कर्जाचा बोजा झाला

.पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर विकासकामांच्या नावाने तब्बल २२ हजार कोटींचं कर्ज केल्याचं बोललं जातं आहे. अजित पवार म्हणाले, महानगर पालिकेवर २२ हजार कोटींचा कर्जाचा बोजा झाला आहे. याबाबत श्रावण हर्डीकर यांना विचारलं दबक्या आवाजात अशी चर्चा सुरू आहे. याविषयी त्यांना सत्य पडताळायला सांगितलं आहे. पिंपरी- चिंचवड शहराचं २५ वर्षं मी नेतृत्व केलं आहे.

# शरद पवार यांचा पावसात शेतकऱ्यांशी संवाद

## खानवडी येथे झालेल्या बाधित शेतकऱ्यांचा संवाद मेळावा घेण्यात आला

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुरंदरमधील नियोजित विमानतळासाठी जमीन मोजणीला शेतकऱ्यांनी परवानगी दिली आहे, भूसंपादनाला नाही. याबाबत लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री अजित पवार आणि शेतकरी यांची एकत्रित बैठक घेऊन मार्ग काढला जाईल.' असे आश्वासन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिले.**



खानवडी येथे झालेल्या बाधित शेतकऱ्यांचा संवाद मेळावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी खासदार सुप्रिया सुळे, विजय कोलते, सुदाम इंगळे, माणिक झेंडे, दत्ता झुरंगे, दत्ता चव्हाण आदी उपस्थित होते .शरद पवार म्हणाले, 'विमानतळ करताना शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्याबरोबर कायम राहणार आहे. आम्ही नवीन जागा बघितली होती. मात्र, नंतर सरकार बदलले. त्यांनी जागा नामंजूर केली. केंद्रातही सरकार त्यांचेच होते. पुन्हा त्यांनी पहिल्याच जागेवर विमानतळ करण्याचे ठरवले. शेतकऱ्यांनी मोजणीला परवानगी दिलेली आहे. जागा घ्यायला परवानगी दिलेली नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या विषयावर मुख्यमंत्री, पालकमंत्री आणि शेतकरी यांची एकत्रित बैठक घेऊन मार्ग काढला जाणार आहे.''मुंबई विमानतळाला जागा देताना शेतकऱ्यांना १२ टक्क्यांऐवजी २२ टक्के एकरी परतावा देण्याचा निर्णय आम्ही घेतला. हिंजवडी येथील आयटी पार्क, मगरपट्टा पार्क बाजारभावाने दिले. आता शेतकऱ्यांना दरवर्षी एकरी लाख रुपये मिळतात. ५० वर्षे ही रक्कम मिळणार आहे. अशा पद्धतीचा मार्ग काढून शेतकऱ्याला योग्य न्याय देण्यात येईल,' असही पवार म्हणाले.

### भर पावसात शेतकऱ्यांशी संवाद

'शेतकरी हा केंद्रबिंदू मानून योग्य मार्ग काढला जाणार आहे. कोणावरही अन्याय होऊ देणार नाही. सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत असून अद्याप कर्जमाफी झालेली नाही.' असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सागितले.खानवडी येथे ज्येष्ठ नेते शरद पवार आल्यावर या परिसरात जोरदार पावसाला सुरुवात झाली. भर पावसात पवार यांनी खानवडीतील महात्मा फुले स्मारक येथे शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी एखतपूर, मुंजवडी, खानवडी, पारगाव, वनपुरी ,उदाचीवाडी, कुंभारवळण या गावांतील शेतकऱ्यांशी चर्चा केली.

DPU
SUPER SPECIALTY HOSPITAL
(A Unit of Dr. D.Y. Patil Medical College, Hospital & Research Centre)
PIMPRI, PUNE



डॉ. पी. डी. पाटील
कुलपती
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.) पिंपरी, पुणे (अभिमत विद्यापीठ)



डॉ. सौ. भाग्यश्रीताई पी. पाटील
प्र-कुलपती
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.) पिंपरी, पुणे (अभिमत विद्यापीठ)



डॉ. यशराज पी. पाटील
विश्वस्त खजिनदार
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.) पिंपरी, पुणे (अभिमत विद्यापीठ)

# जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक सर्व सेवा सुविधांनी परिपूर्ण रुग्णालय

अनुभवी तज्ञ् डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ आणि तत्पर उपचार उत्तम रुग्णसेवेसाठी आम्ही वचनबद्ध आहोत.




- रोबोटिक सर्जरी सेंटर
- कृत्रिम गर्भधारणा व एन्डोस्कोपी सेंटर
- अवयव प्रत्यारोपण सेंटर
- हृदयरोग शस्त्रक्रिया
- TAVI क्लिनिक
- अत्यावश्यक वैद्यकीय सेवा
- मज्जासंस्था (न्यूरो) उपचार
- मूत्रविकार व मूत्रपिंड उपचार
- श्वसन व पोटाचे आणि त्वचारोग उपचार
- कॉक्लियर इम्प्लांट
- अस्थिरोग व रोबोटिक सांधेरोपण शस्त्रक्रिया
- माता आणि बाल विभाग (45 बेडस् चे नवजात अतिदक्षता विभाग व अत्याधुनिक स्वतंत्र प्रसूती संकुल)
- अत्याधुनिक रेडिओलॉजी विभाग

2011 बेड्स | 181 अतिदक्षता विभाग बेड्स | 32 अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह | 24 प्रशस्त ओपीडी

**मोफत प्रसूती (नॉर्मल डिलिव्हरी व सिझेरियन) ची सुविधा उपलब्ध.**

स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग व वेलनेस सेंटर | सुसज्ज आंतररुग्ण विभाग | PMJAY / MJPJAY / RBSK / CGHS / CSMA /ECHS /MPKAY / Central Railway / ESIS / Dhanwantari gold scheme PCMC / शहरी गरीब आरोग्य योजना PMC सर्व शासकीय व खाजगी विमा संरक्षण (इन्शुरन्स) तसेच कॉर्पोरेट कंपनीशी संलग्न आरोग्य विमा संरक्षण

कॉल सेंटर क्र: + 91 706 599 5999 | प्रायव्हेट ओ.पी.डी. क्र: 020-6711 6401
आपत्कालीन संपर्क: 020-6711 6469 | रुग्णवाहिका क्र: +91 888 080 2020
डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय आणि संशोधन केंद्र, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे - 411 018

info@dpuhospital.com | www.dpuhospital.com

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

सायन्स पार्कमध्ये रोबोटिक्स एक्सलन्स सेंटर

# शहराच्या विकासासाठी पुन्हा संधी द्या!

## उपमुख्यमंत्री अजित पवार., आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीच्या माध्यमातूनच

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरामध्ये 1992 ते 2017 या कालावधीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून एकहाती कारभार केला. पाण्याचे व्यवस्थापन, रस्ते, उड्डाणपूल उभारून शहराचा विकास केला. त्यामुळे नागरिकांनी पुन्हा संधी द्यावी असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांनी बुधवारी केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना महायुतीच्या माध्यमातूनच सामोरे जाण्याची अपेक्षा देखील त्यांनी यावेळी व्यक्त केली.**



### महापालिका निवडणुका होईपर्यंत पालिकेचा कारभार हर्डीकर यांच्याकडेच; पालकमंत्र्यांनी केले स्पष्ट

उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली चिंचवड येथे आज जनतेच्या स्थानिक तक्रारींवर थेट तोडगा काढण्यासाठी 'जनसंवाद' कार्यक्रम संपन्न झाला. चिंचवडमधील या उपक्रमात आज सुमारे ३ हजार तक्रारी नोंदविण्यात आल्या, त्यापैकी तब्बल १२०० तक्रारींचे निराकरण तत्काळ करण्यात आले. इतर प्रकरणांवर संबंधित विभागांकडून कार्यवाही सुरू आहे. यानंतर माध्यमांशी बोलताना पवार म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असताना शहरात चांगली कामे केली. त्यामुळे पुन्हा संधी द्यावी, आता आम्ही महायुतीमध्ये आहोत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती असावी आमची अपेक्षा आहे.' पवार पुढे म्हणाले.

माझ्या नेतृत्वाखाली सहकाऱ्यांनी १९९२ पासून २०१७पर्यंत पिंपरी-चिंचवड महापालिकेत चांगले काम केले. त्यावेळी अनेक वर्षे विरोधी पक्षनेता कोण असावा, हे देखील मीच ठरवत होतो. विरोधकांना विश्वासात घेऊन निर्णय घेत होतो. खेळीमेळीच्या वातावरणात महापालिकेचे कामकाज केले. टोकाचे मतभेद निर्माण होऊ दिले नाहीत. विरोधी पक्षाच्या नगरसेवकांची देखील कामे केली आहेत. तसेच 'भामा आसखेड, आंध्र धरणातील पाणी आरक्षित केले. पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प नियोजित केले. शहराची लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प सुरू करून पाणी आणावे लागणार आहे,' असेही ते म्हणाले. हिंजवडीतील कामांना गती दिली आहे. बेशिस्त अवजड वाहनांवर कारवाईच्या सूचना दिल्या जातील, असे पवार यांनी सांगितले.

तत्पूर्वी पवार यांनी कुंजीर चौक, पिंपळे सौदागर परिसरातील वाहतूक आणि रस्ते समस्यांचा सविस्तर आढावा घेतला. अतिक्रमण, पार्किंग व महावितरण संबंधित तक्रारींबाबत तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. नागरिकांना होणारा त्रास दूर करण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी संबंधित विभागांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या.

#### फुटपाथवर कोणाचीही गाडी असेल थेट उचला

पदपथावर वाहने उभी केली जातात. त्यामुळे कोंडीत भर पडते. कोणी दमदाटी केली तर कोणाचे ऐकायचे नाही. कोणाचीही मोटार, वाहने उभी केली असली तरी कारवाई करावी. आम्ही लावलेली वाहने असली तरी उचलावीत असे निर्देश अजित पवार यांनी दिले. गृहनिर्माण सोसायटी, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात घर मिळण्यास विलंब होणे असे विविध प्रश्न घेऊन नागरिक जनसंवादमध्ये आले आहेत. अजित पवार संबंधित अधिकाऱ्यांना व्यासपीठावर बोलावून घेत प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश देत आहेत.

#### पालिकेच्या कर्जासंदर्भात वस्तुस्थिती तपासा

महापालिकेने विविध कामासाठी कर्जरोखे उभारले आहे. महापालिकेला कर्जबाजारी केल्याची चर्चा आहे. त्यामुळे याची वस्तुस्थिती तपासण्याची सूचना महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना केली असल्याचेही त्यांनी सांगितले.

#### महापालिका निवडणुकीनंतर नवीन आयुक्त

महापालिकेचे आयुक्त असलेले शेखर सिंह यांची राज्य शासनाने बदली केली. त्यांच्याकडे नाशिक कुंभमेळ्याची जबाबदारी दिली आहे. महापालिकेचे आयुक्त म्हणून काम केलेले महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार दिला आहे. महापालिका निवडणूक होईपर्यंत त्यांच्याकडेच पदभार राहील. निवडणूक झाल्यानंतर महापालिकेला नवीन आयुक्त दिला जाईल, असेही पवार यांनी सांगितले.

---

# टोळीयुद्धाची 'रील' बनवून फटाका स्टॉलची जाहिरात

## पोलिसांनी केली उचलबांगडी : वाकड पोलिसांची कारवाई

।पिंपरी चिंचवड ।प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांच्या विक्रीत स्पर्धा वाढली आहे. दरम्यान, थेरगाव येथील काही तरुणांनी 'मार्केटिंग'चा एक आगळावेगळा आणि कायदेशीर मर्यादा ओलांडणारा मार्ग निवडला आहे. अंडरवर्ल्ड स्टाईल टोळी युद्धाचा बनावट प्रसंग तयार करून, त्यावर आधारित एक 'थरारक रील' तयार केली आणि ती सोशल मीडियावर टाकताच काही तासांतच व्हायरल झाली. त्यानंतर वाकड पोलिसांनी संबंधित तरुणाची उचलबांगडी करून त्याचा माफीनामा व्हायरल केला.**







दुकानाची जाहिरात व्हावी यासाठी तरुणाने बनवलेल्या रीलमध्ये थेरगावमध्ये खुलेआम घडलेला प्रकार! असे कॅप्शन देण्यात आले होते. त्यात काळ्या कपड्यातील युवक, चेहऱ्यावर गुंडांचे हावभाव आणि हातात प्लास्टिकच्या पिस्तुलांसह बनावट गोळीबाराचे दृश्य दाखवले आहे. शेवटी या रीलचा शेवट फटाक्यांच्या स्टॉलच्या जाहिरातीने होतो. थेरगाव परिसरातील काही नागरिकांनी अर्धवट रील पाहून ती खरी घटना असल्याचे समजून घेतले. त्यामुळे काही वेळातच थेरगावमध्ये गोळीबार झाला अशी अफवा पसरली. वस्तुस्थिती समजल्यानंतर मात्र सोशल मीडियावर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या, फटाक्यांची जाहिरात करायची, पण गुन्हेगारी दाखवून प्रसिद्धी मिळवणे योग्य नाही! काहींनी या कृतीला गुन्हेगारी संस्कृतीचे ग्लॅमरायझेशन म्हटले आहे. वाकड पोलिसांनी या रीलचा तपास सुरू करत 'रीलस्टार' तरुणाची उचलबांगडी केली. त्याला कडक समज देण्यात आली आणि त्याच्याकडून सार्वजनिक माफी मागणारी नवीन रील तयार करून ती सोशल मीडियावर टाकण्यात आली.

> 'भाईगिरी' रील्सवर पोलिसांचे लक्ष अशा प्रकारची मस्ती खपवून घेतली जाणार नाही. गुन्हेगारीला प्रोत्साहन देणारे रील्स बनवणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. पिंपरी चिंचवड पोलिसांनी यापूर्वीही सोशल मीडियावर गुन्हेगारीचे प्रदर्शन करणाऱ्या तथाकथित 'भाई' मंडळींना वठणीवर आणले आहे.
> **- शत्रुघ्न माळी,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलिस ठाणे.



## भूमिका

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी छत्तीसगड येथे 'देशातील नक्षल समस्या २०२६ पर्यंत संपवू' असे विधान केले. त्याला छेद देणारा हल्ला नक्षलींनी घडवून आणला व तोही त्याच राज्यात. असे का व्हावे? मुळात नक्षलवादाची समस्या सोडवण्यासाठी अशी जाहीर विधाने करणे गरजेचे आहे की कृती?**

# नक्षलवाद संपवण्याचा अगम्य आशावाद...



दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेली एखादी समस्या सोडवण्याच्या बाबतीत राज्यकर्त्यांनी आशावादी असणे वा तशा आशयाची विधाने करणे यात काहीच गैर नाही. यामुळे त्या समस्येच्या सोडवणुकीची जबाबदारी असलेल्या यंत्रणातील विविध घटकांमध्ये आत्मविश्वास दुणावतो हे खरे. मात्र हा आशावाद अतिरंजित तसेच वास्तवाशी विसंगत नसावा. तसे झाले तर राज्यकर्त्यांचे हसे होते. ते कसे हे जाणून घ्यायचे असेल तर छत्तीसगडमध्ये नुकत्याच झालेल्या नक्षली हल्ल्याकडे बघायला हवे. अगदी काहीच दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रायपूर येथे २०२६ पर्यंत देशातील नक्षल समस्या संपवू असे जाहीर केले. नेमका त्याला छेद देणारा हा हल्ला नक्षलींनी घडवून आणला व तोही त्याच राज्यात. यात आठ जवान शहीद झाले. याच घोषणेचा आधार घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीत वर्षाच्या पहिल्याच दिवशी असेच विधान केले. सुदैवाने येथे तसे काही घडले नाही व घडूही नये ही अपेक्षा रास्त असली तरी गेल्या पाच दशकांपासून मूळ धरून असलेल्या या समस्येच्या बाबतीत इतका अगम्य आशावाद दर्शवणे योग्य कसे ठरू शकते असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. राज्यघटनेवर नाही तर हिंसेच्या मार्गाने राजकीय सत्ता यावर विश्वास असलेल्या माओच्या विचारांवर उभ्या झालेल्या या चळवळीला अनेक आयाम आहेत व त्याचे स्वरूप बहुपदरी आहे. देशाच्या मध्यभागी असलेल्या आदिवासीबहुल भागात निर्माण झालेला विकासाचा असमतोल, सरकारी पातळीवरून होणारा अन्याय, या भागातील नागरिकांचे सामाजिक व आर्थिक मागासलेपण यातून ही चळवळ उभी राहिली व स्थिरावली. सध्या तिला घरघर लागल्याचे जाणवत असले तरी ती विशिष्ट कालावधीत संपेल असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरू शकते. ताजा हल्ला हेच दाखवून देतो. या चळवळीला सध्या मनुष्यबळाची टंचाई जाणवते आहे, त्यातले एकजात सारे वरिष्ठ नक्षली वृद्धत्वाकडे झुकले आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या हिंसक कारवाया कमी होण्यात झाला हे खरे असले तरी यावरून ते संपले असे म्हणणे नक्कीच घाईचे ठरेल. ते कसे हे समजून घेण्याआधी नक्षली व त्यांची कार्यपद्धती यावर थोडा प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

कुठल्याही सशस्त्र चळवळीचा उद्देश हिंसेच्या माध्यमातून दहशत निर्माण करणे हा असतो. मात्र या चळवळीचा हा एकमेव उद्देश नाही. त्याशिवाय सरकारच्या धोरण विसंगतीवर बोट ठेवणे, जनतेत असंतोष निर्माण करणे, त्याला जनयुद्धाचे स्वरूप देणे, त्यासाठी समर्थक संघटनांच्या माध्यमातून सतत प्रयत्नरत राहणे अशी अनेक कामे या चळवळीकडून होत असतात. दहशतवादी व नक्षली यात फरक आहे असे म्हटले जाते ते या पार्श्वभूमीवर. त्यामुळे यांना संपवायचा निर्धार करायचा असेल तर हे युद्ध सर्वच पातळ्यांवर लढावे लागेल. म्हणजे शस्त्रासहित व शस्त्राविना. शस्त्राच्या लढाईत सध्या सरकारला यश मिळत असेल पण त्याशिवाय जी लढाई (म्हणजे विकासाची) लढायची आहे त्याचे काय? नक्षलग्रस्त भागातील विकासाचे सर्व प्रश्न सुटले असे राज्यकर्त्यांना म्हणायचे आहे काय? तसे असेल तर या भागात शिक्षण, पिण्याचे पाणी, आरोग्य या समस्या अजूनही कायम कशा? नुसते मोठे उद्योग (म्हणजे खाणी) उभारून या भागाचा विकास होईल असे राज्यकर्त्यांना म्हणायचे आहे काय? मुळात खाण म्हणजे विकास हा सरकारी तर्कच चुकीचा आहे. तसे असते तर गेल्या अनेक वर्षांपासून खाणींचे अस्तित्व असलेल्या दंतेवाडाजवळील बैलाडिला परिसरातून नक्षली विचार हद्दपार झाला असता. तसे झाले नाही. उलट या भागात याच खाणमालक वा कंत्राटदारांकडून नक्षली खंडणी उकळू लागले व स्वत:चा कार्यभाग साधत राहिले.

## प्रासंगिक »

### नवा 'हिंदू'दर?

***वस्तू सेवा करातील कपातीमुळे सणासुदीच्या पार्श्वभूमीवरील खरेदी उत्सवास दणक्यात सुरुवात झाली असली तरी अर्थव्यवस्थेचा विकास अशा एखाददुसऱ्या उसळीने होत नाही.***

जागतिक बँकेपाठोपाठ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनेही भारताच्या विकासदराबाबत अंदाज वर्तवला असून तो इतरांपेक्षा अधिक असला तरी ६.६ टक्क्यांच्या आसपासच घोंघावताना दिसतो. या दोघांनीही आगामी आर्थिक वर्षाबाबत भाष्य केले आहे. तेही असेच समानधर्मी आहे. हे दोन्ही अंदाज ६.२ टक्के अथवा ६.३ टक्के असे आजूबाजूला आहेत. नाणेनिधीने आधीच्या अंदाजापेक्षा या नव्या पाहणीत साधारण पाव टक्क्यांनी कपात केली. आपल्या अंदाजात घट केली आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांचे 'राज्यारोहण' झाल्यानंतर जागतिक बाजारपेठेत ज्या लाटा उसळू लागल्या त्याचा हा परिणाम. म्हणजे या कूर्मगतीचे सर्व पातक आपल्याच माथ्यावर आहे असे नाही. त्याचा मोठा वाटा अमेरिकेच्या ट्रम्प यांच्या पदरात घालावा लागणार.

सरकारी कार्यालयांमध्ये आपली कामे वेळेत व्हावीत ही सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे. ती पूर्ण करण्यात मुख्यमंत्री फडणवीस व त्यांचे सरकार यशस्वी झाल्यास महायुती सरकारवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. शासकीय कामकाजात गतिमानता येण्यासाठी कठोर पावले मुख्यमंत्री फडणवीस यांना उचलावी लागतील.

# आघाड्यांची सरकारे सत्तेत राज्याची पीछेहाट झाली



तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी निवड झाल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनात अधिक सुसूत्रता आणण्याकरिता शासकीय कार्यनियमावलीत (रुल्स ऑफ बिझनेस) सुधारणा करण्याबरोबरच सामान्य नागरिकांचे जीवन सुकर व्हावे यासाठी सात कलमी कृती कार्यक्रम जाहीर केला. देशात महाराष्ट्राच्या प्रशासनाचा आदर्श मानला जातो. प्रशासनानेही सरकारच्या कारभारात एक वेगळा ठसा उमटविला होता. एखादी गोष्ट चुकीची असल्यास ती करू नये, असे सांगण्याचे धाडस तेव्हा सनदी अधिकाऱ्यांमध्ये होते. विशेष म्हणजे तेव्हा अधिकाऱ्यांचा सल्ला गांभीर्याने घेतला जात होता. १९९५ नंतर एकापेक्षा अधिक पक्षांच्या आघाड्यांची सरकारे सत्तेत आली व तेव्हापासून राज्याची पीछेहाट सुरू झाली. त्याला प्रशासनही अपवाद ठरले नाही.राज्यकर्त्यांचा वचक असल्यास नोकरशाही किंवा अगदी तळागाळातील कर्मचारी वेडेवाकडे वागण्याचे धाडस करीत नाहीत. त्याच वेळी राज्यकर्त्यांचे हात दगडाखाली असल्यास नोकरशाही डोईजड होते. पोलीस वा सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये अर्थकारण होते असे म्हटले जाते. तसे असल्यास हे अधिकारी पुढे मंत्र्यांनाही जुमानत नाहीत. राज्यकर्त्यांनी आमिषाला बळी पडू नये, असे संकेत असतात. या संदर्भात पुलोद सरकारमधील गृह राज्यमंत्री भाई वैद्य यांचे उदाहरण नेहमी दिले जाते. वैद्य यांच्या पुण्यातील निवासस्थानी एक फौजदार बदलीच्या कामासाठी आला व त्याने चांगल्या ठिकाणी बदलीसाठी पैसे देण्याची तयारी दर्शविली. भाई वैद्य यांनी तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना पाचारण करून त्या फौजदाराला अटक करण्यास भाग पाडले होते. अशी काही उदाहरणे असतील पण ती विरळाच. सामान्य नागरिकांसाठी सात कलमी कार्यक्रम राबविण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उपक्रम स्तुत्यच आहे. यात शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, नागरिकांच्या तक्रारी वा प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत, उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, नागरिकांचे जीवन सुकर व्हावे (ईझ ऑफ लिव्हिंग) या संकल्पनेवर काम करावे, शासकीय प्रकल्पांना भेटी द्याव्यात याचा या सात कलमी कार्यक्रमांमध्ये समावेश करण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या आदेशाची पूर्तता करण्याची जबाबदारी वरिष्ठांपासून ते स्थानिक अधिकाऱ्यांची. या कृती कार्यक्रमाची तंतोतंत अंमलबजावणी झाल्यास शासकीय कारभारात नक्कीच सुधारणा होईल.फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी २०१५ मध्ये नागरिकांना शासकीय सेवा पारदर्शकपणे, गतिमान वा कालबद्ध मुदतीत मिळाव्यात म्हणून 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम' केला होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल

## संजय पाटील, विलासराव जगताप यांच्यावर गुन्हे

# सांगलीत आदेश डावलून आंदोलन

।मुंबई।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**जिल्हाधिकाऱ्यांचा बंदी आदेश डावलून चक्काजाम आंदोलन करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे माजी खासदार, माजी आमदार यांच्यावर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तासगाव व कवठेमहांकाळ येथे मंगळवारी हे आंदोलन करण्यात आले होते. रात्री उशिरा दोन्ही पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

## शेतकर्यांना त्वरित मदत मिळावी




तासगावमध्ये मुख्य बसस्थानक चौकामध्ये जिल्हाधिकाऱ्यांचा बंदी आदेश मोडून चक्काजाम आंदोलन केल्या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे विधानसभा निवडणुकीतील उमेदवार माजी खासदार संजय पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कवठेमहांकाळ तहसिल कार्यालयासमोर चक्काजाम आंदोलन केल्या प्रकरणी माजी खासदार पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा माजी आमदार विलासराव जगताप यांच्यासह कार्यकर्त्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला असून कर्जबाजारी झाला आहे. त्याना कर्ज मुक्ती देण्याची जबाबदारी शासनाची आहे. ती तात्काळ मिळावी, अतिवृष्टीने नुकसान झालेल्या क्षेत्राचे सरसकट पंचनामे करावेत, नुकसान ग्रस्त शेतकर्यांना त्वरित व भरीव मदत मिळावी, ओला दुष्काळ जाहीर करून बँका, सहकारी सोसायटी यांच्या कर्जवसुलीस स्थगिती द्यावी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती जाहीर कराव्यात या मागणीसाठी मंगळवारी चक्काजाम आंदोलन करण्यात आले होते. यामुळे वाहतूक व्यवस्था सुमारे दोन तास खोळंबली होती. तसेच कवठेमहांकाळ येथे तहसिल कार्यालयासमोर चक्काजाम आंदोलन केल्याने जत मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

जिल्हाधिकारी यांचा बंदी आदेश डावलून तासगाव बसस्थानक चौकात चक्काजाम आंदोलन केल्या प्रकरणी तासगाव पोलीस ठाण्यात सरकारच्यावतीने पोलीस कर्मचारी शहाजी साळुंखे यांनी फिर्याद दाखल केली आहे. यामध्ये संजयकाका पाटील, प्रभाकर पाटील, प्रमोद शेंडगे, आरडी उर्फ रविंद्र पाटील, बाबासाहेब पाटील, जाफर मुजावर,सुदीप खराडे, माणिकराव जाधव, हेमंत उर्फ हणमंत पाटील, महेशदादा पाटील, कृष्णा पाटील आदी ११ जणांचा समावेश आहे. कवठेमहांकाळ तहसिल कार्यालयासमोरील चौकात जिल्हाधिकारी यांचा जमावबंदी आदेश असताना बेकायदेशीर जमाव जमा केल्या प्रकरणी माजी खासदार पाटील, माजी आमदार जगताप यांच्यासह किशोर पाटील, जनार्दन पाटील, मोहन खोत, खंडू होवाळे, विशाल उर्फ लाला वाघमारे, अजय पाटील, महादेव सुर्यवंशी, रणजित घाडगे, अजित माने, पिंटू माने आदी १३ जणांविरूध्द पोलीस कर्मचारी विकास सुतार यांनी सरकार पक्षातर्फे फिर्याद दाखल केली आहे.तासगावमध्ये मुख्य बसस्थानक चौकामध्ये जिल्हाधिकाऱ्यांचा बंदी आदेश मोडून चक्काजाम आंदोलन केल्या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे विधानसभा निवडणुकीतील उमेदवार माजी खासदार संजय पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कवठेमहांकाळ तहसिल कार्यालयासमोर चक्काजाम आंदोलन केल्या प्रकरणी माजी खासदार पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा माजी आमदार विलासराव जगताप यांच्यासह कार्यकर्त्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला असून कर्जबाजारी झाला

### सरसकट पंचनामे करावेत

आहे. त्याना कर्ज मुक्ती देण्याची जबाबदारी शासनाची आहे. ती तात्काळ मिळावी, अतिवृष्टीने नुकसान झालेल्या क्षेत्राचे सरसकट पंचनामे करावेत, नुकसान ग्रस्त शेतकर्यांना त्वरित व भरीव मदत मिळावी, ओला दुष्काळ जाहीर करून बँका, सहकारी सोसायटी यांच्या कर्जवसुलीस स्थगिती द्यावी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती जाहीर कराव्यात या मागणीसाठी मंगळवारी चक्काजाम आंदोलन करण्यात आले होते.

# सांगलीत पावसाचा पुन्हा धुमाकूळ

## दिवाळीच्या खरेदीवर पाणी; विक्रेत्यांची त्रेधा

।मुंबई।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**दिवाळीच्या तोंडावर बुधवारी सांगली, मिरजेसह तासगाव परिसरात पावसाचा धुमाकूळ घातला. या पावसाने दिवाळी खरेदीसाठी बाहेर पडलेल्यांची आणि पदपथावर विक्री करणाऱ्या किरकोळ विक्रेत्यांची त्रेधा उडाली.**

ग्रामीण भागात रब्बी ज्वारीची पेरणीची कामे सुरू असून रब्बी हंगामातील उगवणीला आलेल्या शाळू, हरभरा पिकांना आजचा पाउस लाभदायी ठरला असला तरी द्राक्ष बागांवर रोगांना आमंत्रित करणारा ठरला आहे.

गेल्या आठवड्यात बुधवार दि. ९ ऑक्टोबर रोजी वाळवा तालुक्यातील आष्टा, बहे परिसरात अतिवृष्टी नोंदली गेली होती. आष्टा मंडळात रात्रीमध्ये अवघ्या चार तासात १११ तर बहे मंडळात ८३ मिलीमीटर पाउस झाला होता. दि.१० ऑक्टोबरपासून चित्रा नक्षत्र सुरू झाले असून या नक्षत्राचा पाउस पडेलच याची शाश्वती नसताना आज पावसाने हजेरी लावली.मंगळवारी सायंकाळपासून पावसाचे वातावरण तयार झाले होते. मात्र, आज दुपारी पावसाचे आगमन झाले. पावसाने शहरातील सखल भागात पाणी साचले होते. रस्त्यावर पाणी साचल्याने



वाहन धारकांची तारांबळ उडाली. दिवाळीच्या खरेदीसाठी अनेक महिला घराबाहेर पडल्या होत्या. मात्र, अचानक पाउस आल्याने त्यांचाही तारांबळ उडाली. मंगळवारी सायंकाळपासून पावसाचे वातावरण तयार झाले होते. मात्र, आज दुपारी पावसाचे आगमन झाले.पावसाने शहरातील सखल भागात पाणी साचले होते. रस्त्यावर पाणी साचल्याने वाहन धारकांची तारांबळ उडाली. दिवाळीच्या खरेदीसाठी अनेक महिला घराबाहेर पडल्या होत्या.

### ज्वारीची पिके अद्याप रानात उभी

या पेरणी झालेल्या पिकांना आजचा पाउस उपयुक्त ठरला असला तरी काही शेतकर्यांचे खरीप हंगामातील भुईमूग, मका, सोयाबीन, संकरित ज्वारीची पिके अद्याप रानात उभी असून काढणीला आली आहेत.विशेषता तासगाव तालुक्यातील जिरायत रानात अद्याप पिके उभी आहेत.

मात्र, अचानक पाउस आल्याने त्यांचाही तारांबळ उडाली. सांगली महापालिकेने दिवाळी साहित्य विक्रीसाठी दत्त-मारूती रोडवर बंदी घातली असून किरकोळ विक्रेत्यांसाठी तरूण भारत स्टेडियमची उत्तर बाजू ते आनंद चित्रमंदिर ते बाजार समितीचे मैदान या रस्त्यावरच आखून दिलेल्या जागेत बसण्यास परवानगी देण्यात आली आहे. आजच्या पावसाने पदपथावर विक्रेत्यांचीही तारांबळ उडाली. सप्टेंबरमध्ये पडलेल्या पावसानंतर घात आलेल्या रानात रब्बी ज्वारी, हरभरा या पिकांची पेरणीची कामे सुरू आहेत. काही रानात रब्बी हंगामातील पिकांची पेरणी झाली असून बियांची उगवणही होत आहे.

युद्धबंदीवर एकमत

## अफगाणिस्तानमध्ये ४८ तासांच्या युद्धबंदीवर एकमत

# सकारात्मक तोडगा निघणार?

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अफगाणिस्तान आणि पाकिस्तान या दोन शेजारी देशांमध्ये गेल्या काही दिवसांपासून संघर्ष उफाळून आला आहे. पाकिस्तानने अफगाणिस्तानमध्ये हवाई हल्ले केले आणि सीमावर्ती भागांतील चौक्यांवर हल्ला चढवला. यानंतर अफगाणिस्तानने देखील त्याला प्रत्युत्तर दिले.**

### हवाई हद्दीचे वारंवार उल्लंघन



काही दिवसांच्या या संघर्षानंतर अखेर पाकिस्तान आणि तालिबानच्या नेतृत्वाखालील अफगाण सरकार यांच्यात बुधवारी स्थानिक वेळेनुसार संध्याकाळी ६ वाजल्यापासून ४८ तासांच्या युद्ध विरामावर सहमती झाली आहे. याबद्दलची घोषणा पाकिस्तानकडून करण्यात आली आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, दोन्ही देशांनी गुंतागुंतीच्या पण सोडवता येण्याजोग्या समस्येवर सकारात्मक उपाय शोधण्यासाठी संवादाचा मार्ग वापरण्याची वचनबद्धता व्यक्त केली आहे. मात्र याबद्दल तालिबान सरकारकडून अद्याप पुष्टी मिळालेली नाही. सीमेलगतच्या भागात झालेल्या ताज्या संघर्षात अनेक जण जखमी आणि ठार झाल्यानंतर, ही घोषणा करण्यात आली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मंगळवारी रात्री दक्षिण अफगाणिस्थानच्या स्पिन बोल्डक (SPIN BOLDAK) जिल्ह्यात आणि पाकिस्तानच्या चमन जिल्ह्यातील दुर्गम भागात हा संघर्ष पेटला होता. विशेष म्हणजे, या संघर्षासाठी दोन्ही बाजूंनी एकमेकांना दोष दिला आहे.सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर करण्यात आलेल्या एका पोस्टमध्ये, अफगाण तालिबानचे प्रवक्ते जबिउल्लाह मुजाहिद यांनी पाकिस्तानी सैन्यावर लाईट आणि हेवी शस्त्रांनी गोळीबार केल्याचा आरोप केला. या हल्ल्यात १२ नागरिक ठार आणि १०० हून अधिक जखमी झाल्याचा दावा केला आहे.

स्पिन बोल्दाक प्रेस प्रवक्ते अली मोहम्मद हकमल यांनी १५ नागरिकांच्या मृत्यू झाला असल्याचे सांगितले. एएफपीने दिलेल्या माहितीनुसार, एका जिल्हा रुग्णालयाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, जखमींमध्ये ८० महिला आणि मुलांचा समावेश आहे.मुजाहिद यांनी दावा केला की अफगाण सैन्याने प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात मोठ्या संख्येने पाकिस्तानी सैनिक ठार झाले, तसेच त्यांनी शस्त्रे आणि टँक ताब्यात घेतले आणि मिलिट्री इंस्टॉलेशन्स नष्ट करण्यात आले.पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी मात्र तालिबान सैन्याने आधी एका लष्करी चौकीवर आणि जवळपासच्या भागात गोळीबार केला, ज्यामुळे संघर्ष पेटला ज्यामध्ये चार पाकिस्तानी

### १५ नागरिकांच्या मृत्यू झाला

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर करण्यात आलेल्या एका पोस्टमध्ये, अफगाण तालिबानचे प्रवक्ते जबिउल्लाह मुजाहिद यांनी पाकिस्तानी सैन्यावर लाईट आणि हेवी शस्त्रांनी गोळीबार केल्याचा आरोप केला. या हल्ल्यात १२ नागरिक ठार आणि १०० हून अधिक जखमी झाल्याचा दावा केला आहे. स्पिन बोल्दाक प्रेस प्रवक्ते अली मोहम्मद हकमल यांनी १५ नागरिकांच्या मृत्यू झाला असल्याचे सांगितले.

नागरिक जखमी झाले. रॉयटर्सने एका सुरक्षा अधिकाऱ्यांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, सुमारे पाच तास चाललेल्या या संघर्षात सहा पाकिस्तानी सैनिक ठार झाले. मात्र या काळात दोन्ही बाजूच्या सीमेजवळच्या रहिवाशांना या संघर्षामुळे घरे सोडून पळून जावे लागले. काही दिवसांच्या या संघर्षानंतर अखेर पाकिस्तान आणि तालिबानच्या नेतृत्वाखालील अफगाण सरकार यांच्यात बुधवारी स्थानिक वेळेनुसार संध्याकाळी ६ वाजल्यापासून ४८ तासांच्या युद्ध विरामावर सहमती झाली आहे. याबद्दलची घोषणा पाकिस्तानकडून करण्यात आली आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, दोन्ही देशांनी गुंतागुंतीच्या पण सोडवता येण्याजोग्या समस्येवर सकारात्मक उपाय शोधण्यासाठी संवादाचा मार्ग वापरण्याची वचनबद्धता व्यक्त केली आहे. मात्र याबद्दल तालिबान सरकारकडून अद्याप पुष्टी मिळालेली नाही. सीमेलगतच्या भागात झालेल्या ताज्या संघर्षात अनेक जण जखमी आणि ठार झाल्यानंतर, ही घोषणा करण्यात आली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मंगळवारी रात्री दक्षिण अफगाणिस्थानच्या स्पिन बोल्डक (SPIN BOLDAK) जिल्ह्यात आणि पाकिस्तानच्या चमन जिल्ह्यातील दुर्गम भागात हा संघर्ष पेटला होता. विशेष म्हणजे, या संघर्षासाठी दोन्ही बाजूंनी एकमेकांना दोष दिला आहे.

# अमेरिकन पासपोर्ट टॉप १० मधून बाहेर!

## 'हा' ठरला जगातील सर्वात शक्तिशाली पासपोर्ट; भारत 85व्या स्थानावर

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कोणत्याही देशांच्या नागरिकासाठी त्याचा पासपोर्ट हा एक महत्वाचा दस्तावेज असतो. कोणत्या देशाचा पासपोर्ट अधिक प्रभावी आणि कोणत्या देशाचे कमकुवत हे निश्चित करणारी एक यादी जाहीर केली जाते. या २०२५ च्या 'हेन्ले पासपोर्ट इंडेक्स' मध्ये भारताचा पासपोर्ट ८५ व्या क्रमांकावर घसरला आहे. आता भारतीय पासपोर्टधारकांना गेल्या वर्षीच्या ५९ देशांच्या तुलनेत आता फक्त ५७ देशांमध्ये व्हिसा-फ्री प्रवेश मिळणार आहे.**



दरम्यानएकेकाळी जगातील सर्वात शक्तिशाली पासपोर्ट म्हणून ओळखला जाणारा अमेरिकेचा पासपोर्ट गेल्या दोन दशकांत प्रथमच पहिल्या १० देशांच्या यादीतून बाहेर पडला आहे. आता अमेरिकेचा पासपोर्ट हा १२ व्या क्रमांकावर आहे.हे एक प्रकारची जागतिक क्रमवारी आहे. ज्यामध्ये एखाद्या पासपोर्टमुळे नागरिकांना कितीपत प्रवासाचे स्वातंत्र्य मिळते, यानुसार देशांची क्रमवारी लावली जाते. हा इंडेक्स २००५ मध्ये 'हेन्ले अँड पार्टनर्स व्हिसा रिस्ट्रिक्शन इंडेक्स' म्हणून

### २७ देशांमध्ये 'व्हिसा ऑन अरायव्हल

गेल्या वर्षीच्या तुलनेत पाच स्थानांची घसरण झाली आहे. भारतीय पासपोर्टधारक आता ५७ देशांमध्ये व्हिसा-फ्री प्रवास करू शकतात, गेल्या वर्षीच्या हा आकडा ५९ इतका होता.सध्या भारतीय नागरिक १२ ठिकाणी व्हिसा-फ्री प्रवास करू शकतात, ज्यात भूतान, इंडोनेशिया, मॉरिशस, नेपाळ, त्रिनिदाद आणि टोबॅगो यांचा समावेश आहे. याबरोबरच भारतीय नागरिकांना २७ देशांमध्ये 'व्हिसा ऑन अरायव्हल' मिळू शकतो.

सुरू करण्यात आला आणि नंतर जानेवारी २०१८ मध्ये त्याचे नाव बदलून 'हेन्ले पासपोर्ट इंडेक्स' असे करण्यात आले.सिंगापूरचा पासपोर्ट १९३ देशांमध्ये व्हिसा-फ्री प्रवेशामुळे या क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. यानंतर दक्षिण कोरिया आणि जपानचा क्रमांक लागतो. युरोपियन देश जसे की जर्मनी, इटली, स्पेन आणि स्वित्झर्लंड हे देश देखील नेहमीप्रमाणे टॉप १० मध्ये स्थान टिकवून आहेत.भारताचा पासपोर्ट हा २०२५ मध्ये ८५ व्या क्रमांकावर घसरला आहे.

# कुसुमचा शाहरुख खानच्या गाण्यावर जबरदस्त डान्स!

‘ठरलं तर मग’ मालिकेत काम करणाऱ्या सगळ्या कलाकारांचा ऑफस्क्रीन एक वेगळा चाहतावर्ग निर्माण झाला आहे. या मालिकेत अर्जुनच्या जवळच्या मित्राची म्हणजेच चैतन्यची भूमिका अभिनेता चैतन्य सरदेशपांडे साकारत आहे. तर, सायलीच्या मैत्रिणीच्या म्हणजेच कुसुमच्या भूमिकेत अभिनेत्री दिशा दानडे झळकत आहे. सध्या मालिकेत सायली-अर्जुनच्या कॉन्ट्रॅक्ट मॅरेजचं भांड फुटून या दोघांमध्ये कुटुंबीयांमुळे दुरावा आल्याचा सीक्वेन्स चालू आहे. पण, सायली-अर्जुनमधली ही कौटुंबिक दरी कमी करण्यासाठी कुसुम आणि चैतन्य मालिकेत नेहमीच भन्नाट कल्पना शोधत असतात.कुसुम आणि चैतन्य यांची ऑफस्क्रीन एकमेकांशी चांगली मैत्री आहे. यापूर्वी हे दोघं एका तामिळ गाण्यावर थिरकले होते. हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला होता. आता या पाठोपाठ चैतन्य आणि दिशा यांनी आणखी एका सुपरहिट बॉलीवूड गाण्यावर डान्स केला आहे.शाहरुख खान आणि काजोल यांच्या प्रमुख भूमिका असलेला ‘कुछ कुछ होता हैं’ हा चित्रपट १९९८ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटाला या वर्षात तब्बल २७ वर्षे पूर्ण होणार आहेत. शाहरुखच्या चित्रपटातील बहुतांश सगळीच गाणी सुपरहिट ठरली. राहुल,



टिना आणि अंजली कॉलेजमध्ये शिक्षण पूर्ण करत असताना एकत्र ‘मुझको क्या हुआ है?... कोई मिल गया’ या गाण्यावर थिरकले होते. याच बॉलीवूड गाण्यावर चैतन्य आणि दिशा यांनी कमाल एक्स्प्रेशन्स देत जबरदस्त डान्स केला आहे. या दोघांनी सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. यामुळेच या व्हिडीओला अवघ्या दोन दिवसांत १३ लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. या व्हिडीओमध्ये कुसुम साडी नेसून तर, चैतन्य ट्रेडिशनल लूक करुन बॉलीवूड गाण्यावर थिरकत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, चैतन्य आणि दिशा यांच्या डान्स व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. “खूप छान... तुम्ही दोघं पण खूप छान आहात”, “लव्हली”, “डान्स करताना मधुभाऊंना पण घ्या...”, “अप्रतिम मस्तच भारी”, “NICE कुसुम ताई आणि चैतन्य दादा” अशा असंख्य प्रतिक्रिया लिहित नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर लाइक्स अन् कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.

## ‘तुला शिकवीन चांगलाच धडा

‘तुला शिकवीन चांगलाच धडा’ ही मालिका १३ मार्च २०२३ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आली. जवळपास दोन वर्षे ही मालिका सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. या मालिकेच्या निमित्ताने प्रेक्षकांना पहिल्यांदाच शिवानी रांगोळे आणि हृषिकेश शेलारची फ्रेश जोडी एकत्र काम करताना पाहायला मिळाली. या दोघांनी मालिकेत अक्षरा-अधिपतीच्या भूमिका साकारल्या आहेत. प्रत्येक आईसाठी ‘आयडॉल मुलगा’ जसा असतो अगदी तसंच हे अधिपतीचं पात्र आहे. आई भुवनेश्वरीच्या पुढे कोणीही नाही, तिच्या शब्दाबाहेर काहीच नाही अन् तिच्याशिवाय दुसऱ्या कोणाचं ऐकायचं नाही या तत्त्वावर चालणारा अधिपती, कसा साकारायला मिळाला? ही मालिका कशी मिळाली याबद्दल हृषिकेश शेलारने नुकत्याच ‘मित्र म्हणे’ला दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला आहे.

## श्रद्धाच्या फोटोंमुळे चर्चांना उधाण



२०२४ मध्ये श्रद्धा कपूर केवळ ‘स्त्री २’ च्या प्रचंड यशामुळेच नव्हे, तर पटकथा लेखक राहुल मोदीबरोबरच्या तिच्या कथित नात्यामुळेही चर्चेत आली होती. गेल्या काही काळापासून श्रद्धा आणि राहुल डेटिंगमुळे चर्चेत आहेत. अनेकदा एकत्र दिसल्यामुळे तसेच श्रद्धाने सोशल मीडियावर राहुलबरोबरचे फोटो शेअर केल्यामुळे या चर्चांना उधाण आले. अलीकडेच श्रद्धाचा मोबाईल वॉलपेपरचा एक फोटो व्हायरल झाला, ज्यामुळे त्यांच्या नात्याविषयी पुन्हा चर्चा रंगल्या आहेत. गेल्या आठवड्यात श्रद्धा पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाली, तेव्हा तिने कॅज्युअल पोशाख घातला होता. गुलाबी जॅकेट, निळ्या लेगिंग्सवर तिने केस बांधलेले होते. तिच्याबरोबर एक काळ्या रंगाची जिम बॅग होती आणि ती कारमध्ये जाताना दिसली.कारचा दरवाजा उघडताना, तिच्या फोन स्क्रीनची एका क्षणासाठी झलक पाहायला मिळाली. त्यावर एक वॉलपेपर होता, ज्यामध्ये ती आणि एक व्यक्ती एकमेकांजवळ उभे आहे असे त्या फोटोमध्ये दिसते आहे. यावरून चाहत्यांनी लगेचच अंदाज लावला की तो व्यक्ती राहुल मोदीच आहे, जो श्रद्धाचा कथित बॉयफ्रेंड असल्याचे म्हटले जात आहे.डिसेंबर २०२३ मध्ये श्रद्धाने राहुलबरोबरच्या एका आऊटिंगचा फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला होता. त्या फोटोमध्ये वडा पावची प्लेट दिसत होती, ज्यावर तिने कॅप्शन लिहिले होते, “मी नेहमी तुला वडा पाव खायला नेण्यासाठी त्रास देत राहू का?

## सिद्धार्थ चांदेकर-मिताली मयेकरचं भांडण

सिद्धार्थ चांदेकर व मिताली मयेकर ही मराठी कलाविश्वातील प्रेक्षकांच्या लाडक्या जोडप्यांपैकी एक आहे. या जोडीचा चाहतावर्ग मोठा आहे. अनेकविध कलाकृतीतून हे दोघेही प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसतात. याबरोबरच, सोशल मीडियावरदेखील ते सक्रिय असल्याचे पाहायला मिळते. त्यांच्या फोटो, व्हिडीओ, रील्सना प्रेक्षकांची मोठी पसंती मिळते. आता हे सेलेब्रिटी जोडपे पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर एकत्र काम करताना दिसणार आहे. फसक्लास दाभाडे या चित्रपटाच्या निमित्ताने सिद्धार्थ व मिताली पहिल्यांदाच एकत्र काम करणार आहे. या चित्रपटात त्यांनी नवरा-बायकोची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाची सर्वांनाच उत्सुकता आहे. आता मात्र, चित्रपटामुळे नाही तर सिद्धार्थच्या एका वक्तव्यामुळे हे जोडपे चर्चेत आहे. लग्नादिवशीच त्यांचे मोठे भांडण झाले होते, असा खुलासा त्यांनी एका मुलाखतीदरम्यान केला आहे. फर्स्टक्लास दाभाडे या चित्रपटाच्या टीमने नुकताच नवशक्ती या युट्यूब चॅनेलशी संवाद साधला.



## ‘ठरलं तर मग’च्या सेटवर मोनिकाचं डोहाळेजेवण

‘ठरलं तर मग’ मालिकेने गेली दोन वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. या मालिकेत अर्जुनच्या सख्ख्या बहिणीची म्हणजेच अस्मिची भूमिका अभिनेत्री मोनिका दबडेने साकारली आहे. खऱ्या आयुष्यात मोनिका लवकरच आई होणार आहे. काही दिवसांपूर्वीच इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत अभिनेत्रीने ती आई होणार असल्याचं जाहीर केलं होतं. नुकताच अभिनेत्रीच्या डोहाळेजेवणाचा कार्यक्रम पार पडला.मोनिका दबडेचं डोहाळेजेवण ‘ठरलं तर मग’ मालिकेच्या सेटवर पार पडलं. तिच्या डोहाळेजेवणासाठी सेटवर सुंदर अशी सजावट करण्यात आली होती. याशिवाय मालिकेतल्या सगळ्या अभिनेत्रींनी ऑफस्क्रीन एकत्र येऊन या डोहाळेजेवणाच्या कार्यक्रमात धमाल केल्याचं व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. याचे अनेक INSIDE व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. जुई गडकरी, ज्योती चांदेकर, प्रियांका तेंडोलकर, प्राजक्ता दिघे, श्रद्धा केतकर, दिना दानडे, मयुरी मोहिते, केतकी पालव अशा ‘ठरलं तर मग’ मालिकेत महत्त्वाच्या भूमिका साकारणाऱ्या सगळ्या अभिनेत्री मोनिकाच्या डोहाळेजेवणासाठी एकत्र जमल्या होत्या होत्या. यांनी तिचं स्वागत करताना सुंदर डान्स केले. अभिनेत्री आई होणार असल्याने तिचे सगळे लाड पुरवून कौतुक केलं. मोनिकाला तिच्या आवडीचे पदार्थ खाऊ घातले. ‘ठरलं तर मग’ मालिकेच्या निर्मात्या सुचित्रा बांदेकर यांनी देखील या कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती.मोनिकाने डोहाळेजेवणासाठी सुंदर अशी साडी नेसून पारंपरिक लूक केला होता. यावर फुलांचे दागिने, साडीवर ‘आई’ नाव लिहिलेला बॅच, हातात फुलांची परडी या लूकमध्ये मोनिका खूपच सुंदर दिसत होती. मोनिका व तिच्या पतीने या कार्यक्रमात एकमेकांसाठी खास उखाणे घेतले.

**हँडशेक मुद्द्यावरून वादंग** मोदी सरकारवर टीका, मैदानात नेमकं काय घडलं?

# पाकिस्तानबरोबर नो हँडशेकला पूर्णविराम?

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नुकत्याच झालेल्या आशिया चषक २०२५ मध्ये भारतीय आणि पाकिस्तानी क्रिकेटपटूंनी हस्तांदोलन केलं नव्हतं. त्यामुळे हस्तांदोलनाच्यामुद्द्यावरून एक मोठा वाद निर्माण झाला. २०२५ च्या महिला विश्वचषकातही भारतीय क्रिकेटपटूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन केलं नाही. पण मात्र भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यात वेगळंच चित्र पाहायला मिळालं.**

## आता हॉकीमध्ये मात्र वेगळं चित्र



मलेशियातील जोहोर बारू येथे सुरू असलेल्या सुलतान जोहोर कप ज्युनियर हॉकी स्पर्धेत भारत आणि पाकिस्तानच्या खेळाडूंनी हस्तांदोलन केलं नाही तर एकमेकांना हाय फाइव्ह देताना दिसले. पण भारताच्या महिला आणि पुरूष संघाने घेतलेल्या या निर्णयाला हॉकी संघ मात्र पुढे घेऊन जाऊ शकला नाही.यानंतर अनेकांनी सोशल मीडियावर याबाबत प्रतिक्रिया दिल्या आहेत, पहलगामच्या शहीदांचा विश्वासघात करण्यात आला आहे. दरम्यान, पाकिस्तानमधील युजर्सने म्हटलं की हे खिलाडूवृत्तीचं खरं उदाहरण आहे. पण गेल्या अनेक दिवसांपासून त्यावर चर्चा सुरू आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हा सामना ३-३ असा बरोबरीत राहिला. आशिया चषकात टीम इंडियाने पहिल्याच सामन्यापासून स्पष्ट केलं होतं की ते पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करणार नाहीत, ज्यामुळे पाकिस्तानने संतापून बरीच पावलं उचलली, स्पर्धेदरम्यान अनेक वाद पाहायला मिळाले, पण भारताने काही माघार घेतली. परंतु हॉकीच्या मैदानावर हा वाद संपुष्टात येत असल्याचे दिसून येत आहे. भारत-पाकिस्तान हाई-फाईव्हचे फोटो व्हायरल होताच चाहत्यांनी मात्र मोदी सरकारला लक्ष्य केलं आहे. क्रिकेटमध्ये हँडशेक न करण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचा चाहत्यांनी म्हटलं आहे.मलेशियामध्ये सुल्तान ऑफ जोहोर कपचे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात १४ ऑक्टोबर रोजी एक सामना झाला. हा रोमांचक सामना ३-३ असा बरोबरीत सुटला. दुसऱ्या हाफपर्यंत पाकिस्तानने २-० अशी आघाडी घेतली होती आणि टीम इंडियावर दबाव कायम ठेवला होता.

त्यानंतर भारतीय संघाने पाच मिनिटांत तीन गोल करून स्कोअर ३-२ असा केला. त्यानंतर पाकिस्तानने शेवटच्या पाच मिनिटांत आणखी एक गोल करून स्कोअर ३-३ केला, ज्यामुळे सामना बरोबरीत सुटला. मलेशियातील जोहोर बारू येथे सुरू असलेल्या सुलतान जोहोर कप ज्युनियर हॉकी स्पर्धेत भारत आणि पाकिस्तानच्या खेळाडूंनी हस्तांदोलन केलं नाही तर एकमेकांना हाय फाइव्ह देताना दिसले. पण भारताच्या महिला आणि पुरूष संघाने घेतलेल्या या निर्णयाला हॉकी संघ मात्र पुढे घेऊन जाऊ शकला नाही.यानंतर अनेकांनी सोशल मीडियावर याबाबत प्रतिक्रिया दिल्या आहेत, पहलगामच्या शहीदांचा विश्वासघात करण्यात आला आहे. दरम्यान, पाकिस्तानमधील युजर्सने म्हटलं की हे खिलाडूवृत्तीचं खरं उदाहरण आहे. पण गेल्या अनेक दिवसांपासून त्यावर चर्चा सुरू आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हा सामना ३-३ असा बरोबरीत राहिला.आशिया चषकात टीम इंडियाने पहिल्याच सामन्यापासून स्पष्ट केलं होतं की ते पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करणार नाहीत, ज्यामुळे पाकिस्तानने संतापून बरीच पावलं उचलली, स्पर्धेदरम्यान अनेक वाद पाहायला मिळाले, पण भारताने काही माघार घेतली. परंतु हॉकीच्या मैदानावर हा वाद संपुष्टात येत असल्याचे दिसून येत आहे. भारत-पाकिस्तान हाई-फाईव्हचे फोटो व्हायरल होताच चाहत्यांनी मात्र मोदी सरकारला लक्ष्य केलं आहे. क्रिकेटमध्ये हँडशेक न करण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचा चाहत्यांनी म्हटलं आहे.मलेशियामध्ये सुल्तान ऑफ जोहोर कपचे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात १४ ऑक्टोबर रोजी एक सामना झाला. हा रोमांचक सामना ३-३ असा बरोबरीत सुटला. दुसऱ्या हाफपर्यंत पाकिस्तानने २-० अशी आघाडी घेतली होती आणि टीम इंडियावर दबाव कायम ठेवला होता.त्यानंतर भारतीय संघाने पाच मिनिटांत तीन गोल करून स्कोअर ३-२ असा केला.

### हस्तांदोलनावरून एक मोठा वाद

एक गोल करून स्कोअर ३-३ केला, ज्यामुळे सामना बरोबरीत सुटला.नुकत्याच झालेल्या आशिया चषक २०२५ मध्ये भारतीय आणि पाकिस्तानी क्रिकेटपटूंनी हस्तांदोलन केलं नव्हतं. त्यामुळे हस्तांदोलनाच्यामुद्द्यावरून एक मोठा वाद निर्माण झाला. २०२५ च्या महिला विश्वचषकातही भारतीय क्रिकेटपटूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन केलं नाही.

# रणजीमध्ये महाराष्ट्राची उडाली भंबेरी!

## 4 षटकांत 4 गडी बाद, पृथ्वी शॉसह तिघे शून्यावर बाद

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रणजी ट्रॉफी २०२५ मधील सामन्यांना सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत अनेक स्टार खेळाडूंवर नजरा असणार आहेत. रणजी ट्रॉफी २०२५-२६ हंगाम बुधवार, १५ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. महाराष्ट्र संघाचा पहिला सामना केरळ संघाविरूद्ध खेळवला जात आहे. या सामन्यात महाराष्ट्राची सुरूवात खराब झाली आहे. मुंबईतून महाराष्ट्र संघात गेलेला पृथ्वी शॉ शून्यावर बाद झाला आहे.**



महाराष्ट्र आणि केरळ यांच्यातील सामना तिरूवनंतपुरम येथे खेळवला जात असून या सामन्याची नाणेफेक केरळने जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे.

केरळसाठी हा निर्णय अगदी योग्य ठरला. कारण महाराष्ट्र संघाने ४ षटकांत ५ धावा करत ४ विकेट्स गमावले आहेत. केरळच्या दोन गोलंदाजांपुढे अक्षरश: महाराष्ट्र संघाने गुडघे टेकले आहेत.आश्चर्य म्हणजे एकाही फलंदाजाने अद्याप खातंही उघडलेलं नाही.

बाद झालेल्या चारपैकी एकाही फलंदाजाने खातं उघडलं नाही. महाराष्ट्र संघाचा नवा सलामीवीर पृथ्वी शॉ चार चेंडूत शून्यावर बाद झाला, तर अर्शीन कुलकर्णी व सिद्धेश वीर गोल्डन डकवर बाद झाले. त्यानंतर कर्णधार अंकित बावणे ७ चेंडूत खाझटपट ४ विकेट्स गमावल्यानंतर कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि सौरभ नवले यांनी संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण चांगल्या सुरूवातीनंतर सौरभ नवलेदेखील बाद झाला आहे. ऋतुराजबरोबर आता मैदानात जलज सक्सेना फलंदाजीला आला आहे. यासह महाराष्ट्राने १२ षटकांत ५ बाद २६ धावा केल्या आहेत.

### बेसिल याने २ विकेट्स घेतल्या

केरळकडून एम डी निधीश याने ३ विकेट्स तर नेदुमनकुझी बेसिल याने २ विकेट्स घेतल्या आहेत.तं न उघडता बाद झाला. अंकित बावणे (कर्णधार), पृथ्वी शॉ, ऋतुराज गायकवाड, सौरभ नवले (यष्टीरक्षक), जलज सक्सेना, रजनीश गुरबानी, विकी ओस्तवाल, सिद्धेश वीर, मुकेश चौधरी, अर्शीन कुलकर्णी, रामकृष्ण घोष

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। गुरुवार।

। दि. 16 ऑक्टोबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मिशन PCMC : महापालिका निवडणुकीत

# सोसायटी प्रतिनिधींना उमेदवारी द्या!

### चिंचवड रेसिडेंट डेव्हलपमेंट अँड वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष सचिन लोंढे यांची मागणी

## सोसायटीधारकांच्या प्रश्नांची जाण असणारा उमेदवार हवा!

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांच्या समस्या, हक्क आणि स्थानिक विकास यावर स्पष्ट, ठाम आणि परिणामकारक भूमिका घेत पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनने आता स्थानिक राजकारणात थेट हस्तक्षेप करण्याचा इशारा दिला आहे. फेडरेशनचे उपाध्यक्ष सचिन लोंढे यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, "आगामी महापालिका निवडणुकीत पिंपरी, चिंचवड आणि भोसरी – या तीनही विधानसभा मतदारसंघांत प्रत्येक प्रमुख राजकीय पक्षाने सोसायटी प्रतिनिधींना उमेदवारी व प्रतिनिधित्व द्यावे. अन्यथा फेडरेशन स्वतंत्ररित्या निवडणुकीच्या रिंगणात उतरेल."**

पिंपरी-चिंचवड शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांच्या समस्या, हक्क आणि स्थानिक विकास यावर स्पष्ट, ठाम आणि परिणामकारक भूमिका घेत वाकड- पिंपरी- चिंचवड रेसिडेंट डेव्हलपमेंट अँड वेल्फेअर असोसिएशनने आता स्थानिक राजकारणात थेट हस्तक्षेप करण्याचा इशारा दिला आहे. असोसिएशनचे अध्यक्ष सचिन लोंढे यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, "आगामी महापालिका निवडणुकीत पिंपरी, चिंचवड आणि भोसरी – या तीनही विधानसभा मतदारसंघांत प्रत्येक प्रमुख राजकीय पक्षाने सोसायटी प्रतिनिधींना उमेदवारी व प्रतिनिधित्व द्यावे. अन्यथा फेडरेशन स्वतंत्ररित्या निवडणुकीच्या रिंगणात उतरेल." "शहरातील ८०-९०% नागरिक विविध गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये राहतात. शहराचा आर्थिक, सामाजिक आणि नागरी चेहरा हे हेच मतदार घडवतात. पण या सोसायटींना आजवर महापालिकेच्या निर्णय प्रक्रियेत स्थान मिळालेले नाही. हे प्रतिनिधित्व नसणे हे लोकशाहीच्या विरोधात आहे." "निवडणुकांच्या वेळेस या मतदारांकडे 'वोटबँक' म्हणून पाहिले जाते, मात्र निर्णय घेणाऱ्या पातळीवर सोसायटीतील जाणकार, जागरूक आणि स्वच्छ प्रतिमेच्या उमेदवारांना उमेदवारी दिली जात नाही. असोसिएशनने गेली काही वर्षे शहरातील विविध प्रश्नांवर कार्यरत आहे. परंतु मागील वर्षभरात त्यांनी अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर ठाम भूमिका घेतली आहे. वाकड- पिंपरी- चिंचवड रेसिडेंट डेव्हलपमेंट अँड वेल्फेअर असोसिएशनच्या माध्यमातून गृहनिर्माण सोसायटींसाठी पाणी कनेक्शन व बिल आकारणीचा तिढा, स्वच्छ आणि पुरेसा पाणीपुरवठा, टँकरमुक्त सोसायटी, महापालिकेचा एसटीपी प्रकल्प व त्यात होणारा खर्च सोसायट्यांवर ढकलणे, रस्त्यांच्या रुंदीकरणात होणाऱ्या सोसायट्यांच्या नुकसानांची भरपाई, सोसायटी व्यवस्थापनांवर होणाऱ्या अन्यायकारक दंडात्मक कारवाया, या पार्श्वभूमीवर फेडरेशनने केवळ एक सामाजिक संस्था म्हणून मर्यादित न राहता, स्वतःचे राजकीय अस्तित्व सुद्धा निर्माण करावे अशी भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. सचिन लोंढे म्हणाले की, "आजघडीला आपल्याला असे उमेदवार पाहिजेत, जे सोसायटीच्या प्रश्नांची जाणीव असणारे, तंत्रज्ञानसमज असलेले आणि प्रशासनाशी समन्वय साधू शकणारे असावेत. पारंपरिक राजकीय नेते हे अनेकदा केवळ पक्षीय कार्यक्रमापुरते मर्यादित असतात. गृहनिर्माण क्षेत्रातील बारकावे, कायदे, पर्यावरणविषयक प्रश्न, पाणीवाटप, सांडपाणी प्रक्रिया, स्मार्ट सिटी प्रकल्प यांची माहिती असणाऱ्यांनाच आता पुढे आणायला हवे."



"हिंजवडी आयटी हबमधील वाहतूक कोंडी असो, वाकडच्या दत्त मंदिर रोडचे रुंदीकरण, हवा-पाणी-नदी यांचे वाढते प्रदूषण असो, की पाणीपुरवठा आणि अतिक्रमणमुक्त फुटपाथची मागणी — आम्ही सर्वच स्तरांवर सातत्याने आवाज उठवला आहे. पुनावळेतील कचरा डेपोसारख्या मुद्द्यावर तर सोसायटीधारकांनी एकत्र येत यशस्वी लढाही उभारला. आता वेळ आली आहे की या आवाजाला प्रशासनाच्या दरबारात निर्णयक्षम प्रतिनिधित्व मिळावं. आम्ही केवळ प्रश्न मांडत नाही, तर त्यावर तोडगाही देतो — आणि हेच आमचं बळ आहे."

**—सचिन लोंढे,** उपाध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.

### तीन विधानसभा मतदारसंघांमधून उमेदवारांची मागणी

असोसिएशनने आपली मागणी फार स्पष्टपणे मांडली आहे. त्यांनी शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तीनही विधानसभा मतदारसंघांतून प्रत्येक पक्षाने किमान एक प्रतिनिधी असोसिएशनशी संलग्न सोसायटीचा निवडावा अशी अट मांडली आहे.

"जर प्रमुख पक्षांनी आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर वाकड- पिंपरी- चिंचवड रेसिडेंट डेव्हलपमेंट अँड वेल्फेअर असोसिएशन स्वतंत्ररित्या निवडणुकीच्या रिंगणात उतरेल. आम्ही आमचे उमेदवार उभे करू. शहरातील जनतेकडे आम्ही जाऊ आणि त्यांना एक पर्याय देऊ." असोसिएशनच्या या भूमिकेमुळे शहरातील प्रमुख राजकीय पक्ष – भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस आणि मनसे यांना सोसायटीच्या प्रतिनिधींना संधी देण्याबाबत विचार करावा लागणार आहे.

# इंद्रायणीनगरमधील रस्त्यांचे काम तातडीने हाती घ्या!

### आयुक्त श्रावण हर्डीकर यांना मागणी : भाजपा मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे यांचे अधिकाऱ्यांना निवेदन

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**इंद्रायणीनगर प्रभाग क्रमांक आठमधील सेक्टर 9, 11, 13 येथील सर्विस रोड तसेच सेक्टर 4, 12 व एमआयडीसी परिसरातील रस्त्यांची दुरावस्था दूर करून आवश्यक नागरी सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी भाजपाचे इंद्रायणीनगर मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे यांनी आयुक्त व प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्याकडे केली आहे.**



याबाबत महापालिका क-प्रभागाचे कार्यकारी अभियंता श्री. नरोटे यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, महानगरपालिका प्रशासनामार्फत आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामांना चालना मिळत आहे. मात्र इंद्रायणीनगरमधील काही रस्त्यांची स्थिती अत्यंत खराब असून, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. विशेषतः स्पाईन रोडलगतच्या सेक्टर 9, 11 आणि 13 मधील सर्विस रोडवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, पावसाळ्यात पाणी साचल्यामुळे अनेक अपघात घडले आहेत. यामुळे विद्यार्थी, महिला आणि नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात अडथळे निर्माण होत आहेत.

एमआयडीसी परिसरातील रस्त्यांची देखील तातडीने डागडुजी व डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

## पिंपरी चिंचवड शहराच्या लौकिकात मानाचा तुरा

# प्रियदर्शनी स्कूलच्या शरयू रांजणे हिची भारतीय संघात निवड

### तीनही संघात निवड होणारी शरयू ही भारतातील एकमेव खेळाडू

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दहा प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल भोसरी इंद्रायणी नगर येथील एसएससी बोर्ड इयत्ता दहावीची विद्यार्थिनी शरयू रांजणे हिची भारतीय बॅडमिंटन संघात निवड झाली आहे. शरयूच्या या कामगिरीमुळे पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकीकात मानाचा तुरा खोवला गेला आहे. याबद्दल शाळेच्या वतीने तिचे कौतुक देखील करण्यात आले आहे.**



शरयू रांजणेची सिंगल, डबल आणि मिक्स डबल स्पर्धेमध्ये निवड झाली असून तीनही संघात निवड होणारी शरयू ही भारतातील एकमेव खेळाडू आहे. चीन येथे होणाऱ्या एशियन बॅडमिंटन चैम्पियनशिप स्पर्धेमध्ये शरपू भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलतर्फे नुकताच शरयूचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शाळेच्या संस्थापक सचिव तरुणा सिंह यांच्या हस्ते शरयूला गौरविण्यात आले. यावेळी शाळेच्या प्राचार्या अर्पिता दीक्षित, डॉ. गायत्री जाधव तसेच शरयूचे कुटुंबीय आदी उपस्थित होते.

शरयू हिने यापूर्वी महाराष्ट्र व देशातील विविध ठिकाणी बॅडमिंटन स्पर्धेत सहभागी होऊन पारितोषिके मिळवली आहेत. शरयू ही पूर्व प्राथमिक वर्गापासून प्रियदर्शनी स्कूलची विद्यार्थिनी आहे तिच्या या गौरवास्पद कामगिरीचे प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलचे संचालक विश्वस्त डॉ राजेंद्र सिंह, डॉ. जितेंद्र सिंह, नरेंद्र सिंह, महेंद्र सिंह, सरिता सिंह यांनी कौतुक केले असून चीन मध्ये होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना**

प्रियदर्शनी स्कूलतर्फे विद्यार्थ्यांच्या केवळ शैक्षणिक विकासाला चालना दिली जात नाही तर कला, क्रीडा क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. भाविक अहिरे ही सुद्धा प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलची विद्यार्थिनी आहे. इंद्रायणी नगर येथील सीबीएसई बोर्डाची विद्यार्थिनी आहे. भाविकाने अंडर 19 साठी क्रिकेट संघात स्थान मिळाले आहे. तसेच वर्ल्डकप जिंकून आणणाऱ्या संघाचे प्रतिनिधित्व केले होते.

**शिक्षण क्षेत्रात नवा आयाम**

प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल या शिक्षण संस्थेला मोठा शैक्षणिक वारसा आहे. गेल्या 30 वर्षात पिंपरी चिंचवड शहरांमध्ये शाळेने शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता जागतिक व्यासपीठावर चमकावे यासाठी शाळेचे प्रयत्न असतात. याच धर्तीवर “ब्रह्मप्रिया” संस्थेच्या माध्यमातून प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल शिक्षण क्षेत्राला नवा आयाम देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे शाळेच्या संस्थापक सचिव तरुणा सिंह यांनी सांगितले. ब्रह्मप्रिया ही शैक्षणिक, संस्था, अध्यात्म, खेळ,आरोग्य, या सर्व गोष्टींचा पुरस्कार करून सर्वांगीण शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे तरुणा सिंह यावेळी म्हणाल्या.

---

## बिग बींनी थोपटली पुरंदरच्या रांगोळी चित्रकाराची पाठ!

### सोमनाथ भोंगळे यांच्या कलेला अमिताभ बच्चन यांचा मानाचा मुजरा

। पुणे ।
विजयकुमार हरिश्चंद्रे : महाईन्यूज

**बॉलीवूडचे शहेनशाह आणि अनेकांच्या प्रेरणास्थान असलेल्या अमिताभ बच्चन यांनी पुरंदर तालुक्यातील नामवंत रांगोळी कलाकार सोमनाथ भोंगळे यांच्या प्रतिभेची दखल घेत थेट मुंबईतील ‘जलसा’ बंगल्यावर बोलावून त्यांचा सन्मान केला. भोंगळे यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही बिग बींच्या वाढदिवसानिमित्त साकारलेल्या थ्रीडी रांगोळ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.**



चित्रपटसृष्टीतील त्यांच्या अनेक अविस्मरणीय भूमिका, अगदी ‘शोले’मधील जयपासून ते ‘पिकू’मधील भास्कर बॅनर्जीपर्यंतच्या व्यक्तिरेखा हुबेहूब रंगावल्या गेल्या. या सृजनशीलतेमुळे भारावून गेलेल्या बच्चन यांनी स्वतः फोन करून भोंगळेंना भेटीसाठी आमंत्रित केले आणि त्यांच्या कलेला मुक्तकंठाने दाद दिली. ही त्यांची दुसरी भेट असून, अचानक आलेल्या फोनमुळे भोंगळे चकित झाले. “हा क्षण मी कधीही विसरणार नाही,” असे त्यांनी सांगितले. जलसा या बच्चन यांच्या निवासस्थानी प्रत्यक्षात रांगोळी साकारण्याची संधी मिळणे हे कोणत्याही कलाकारासाठी स्वप्नवत ठरावे असेच आहे.

> “अमिताभ बच्चन सरांचा अचानक आलेला फोन माझ्यासाठी स्वप्नवत होता. त्यांनी माझ्या रांगोळी कलेची दखल घेतली, जलसा बंगल्यावर आमंत्रित केलं आणि स्वतःच्या हाताने पाठ थोपटली... हा क्षण माझ्या आयुष्याचा सर्वोच्च सन्मान आहे. ही केवळ भेट नव्हे, तर एका ग्रामीण कलाकाराच्या कलेला मिळालेली मोठी पावती आहे.”
>
> -– **सोमनाथ भोंगळे,** रांगोळी कलाकार.

सोमनाथ भोंगळे हे विविध सामाजिक, सांस्कृतिक विषयांवर आधारित रांगोळ्यांसाठी ओळखले जातात. त्यांची ‘पंढरपूर वारी’वरील रांगोळी मालिकाही विशेष गाजली आहे. मात्र बिग बी हे त्यांचे विशेष जिव्हाळ्याचे दैवत असून, दरवर्षी त्यांचा वाढदिवस हा एक रांगोळी सोहळा ठरतो. बिग बींनी त्यांच्या पाठीवर टाकलेली कौतुकाची थाप आणि दिलेला वेळ हा भोंगळे यांच्यासारख्या ग्रामीण भागातील

www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

Admission Open

FOR 2026 – 27

Nursery – Std X

- **CBSE** Curriculum
- **Separate Sports Teachers** for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with **AV Facilities**
- **Skill Development Programs** including:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on **Holistic Development**

Enroll Now!

Sunday Open: From 10 AM to 1 PM



**Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!**

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

www.rklgis.org

RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs: Robotics Dance, Music, Speech & Drama Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune